# प्रेसनोट

दि. ०७/१०/२०२४

**घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील मंडल अधिकारी व खाजगी इसम यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | घोडेगांव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, १२. |
| तक्रारदार | पुरुष, वय ६४ वर्ष |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) श्रीधर भागचंद आचारी, वय ५२ वर्ष, पद – मंडल अधिकारी, नेमणुक – घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे (वर्ग-३)<br>२) श्री. निशांत तुकाराम लोहकरे, वय ३७ वर्ष, रा. मु.पो. घोडेगांव, ता. आंबेगांव, जि. पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | ५,०००/- |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. ३०/०९/२०२४ व ०७/१०/२०२४ रोजी. |
| सापळा दिनांक | दि. ०७/१०/२०२४ |
| ठिकाण | मंडल अधिकारी कार्यालय, घोडेगांव, ता. आंबेगांव, जि. पुणे. |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी दि. ०७/०३/२०२४ रोजी तलाठी गिरवली, ता. आंबेगाव, जि. पुणे यांचेकडे फेरफार नामंजुर होणेबाबत तसेच त्याच्या मंजुरीला हरकत असल्याचा अर्ज दिला होता. सदर अर्जाची सुनावणी क्र. १ लोकसेवक श्रीधर आचारी, मंडल अधिकारी, घोडेगांव यांचेकडे सुरु होती. त्याबाबत तक्रारदार हे लोकसेवक श्रीधर आचारी यांना भेटले असता, त्यांनी त्यांचे कार्यालयात काम करणारे खाजगी इसम निशांत लोहकरे यांना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार हे क्र. २ खाजगी इसम निशांत लोहकरे यांना भेटले असता, त्यांनी तक्रारदार यांचे तक्रार अर्जावरुन फेरफार नामंजुर होणेकरीता लोकसेवक श्रीधर आचारी मागतील त्याप्रमाणे पैसे द्या असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार हे क्र. १ लोकसेवक श्रीधर आचारी यांना भेटले असता, त्यांनी तक्रारदार यांचेकडे फेरफार नामंजुर करणेकरीता १०,०००/- रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे केली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, क्र. १ लोकसेवक श्रीधर आचारी यांनी तक्रारदार यांचेकडे वरील नमुद काम करणेकरीता पंचासमक्ष तडजोडीअंती ५,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, क्र. १ लोकसेवक श्रीधर आचारी यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ५,०००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली व खाजगी इसम क्र. २ निशांत लोहकरे यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम देणेबाबत प्रोत्साहन दिले म्हणून त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध घोडेगांव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, १२ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक रुपेश जाधव तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner